नि.दि.दा.क्र.१४/२०१५
**रिषी वि. बबन**
**नि. – ५९ खाली**

**पुढील उलटतपास शपथेवरप्रतिवादी क्र.४ तर्फे श्री. पि. एस. सायरे वकील साहेबः**

**१९.** सर्वे क्र.१० ची चतुर्सिमा मी सांगू शकत नाही. सन २००४ आधी मी सर्वे क्र.१० च्या शेत जमिनीवर गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पुर्वी सर्वे क्र.१० ची शेत जमिन प्रतिवादी क्र.१ बबन करत होता. माझ्या आईचे नाव सर्वे क्र.१० च्या शेत जमिनीवर लागले होते याबाबत मी कागदपत्र दाखल केला आहे. ७/१२ उतारा दाखल केला आहे. मी न्यायालयातील कागदपत्र पाहून सांगू शकतो. सदर कागद नि.७७ वर दाखल आहे. माझ्या आईचे नाव प्रतिवादी क्र.१ ने कमी केले हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कागदपत्रे नाही. दावा दाखल करतेवेळी सर्वे क्र.१० चा ७/१२ उतारा मी पाहीला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र.४ चे नाव ७/१२ उता-यावर दाखल झाले होते.

प्रश्न. प्रतिवादी क्र.४ चे नाव विक्रीपत्र झाल्यानंतर ७/१२ उता-यावर दर्ज झाले असे म्हणणे बरोबर होईल का?

उत्तर. होय. ७/१२ उतारा काढला तेंव्हा नाव दिसून आले.

**२०.** हे मला आठवत नाही की, प्रतिवादी क्र.४ चे नाव ७/१२ उता-यावर दर्ज झाल्यानंतर मी नोटीस पाठविली होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, २००४ पर्यंत प्रतिवादी क्र.१ बबन शेती करत होता त्यामुळे आजूबाजुच्या लोकांना तो मालक होता हे माहीत होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००४ साली प्रतिवादी क्र. १ एकटयाचे नाव दर्ज होते. सन २००४ साली माझ्या आईचे नाव सर्वे क्र.१० च्या ७/१२ उता-यावर दर्ज होते हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा नाही. हे मला आठवत नाही की, दावा दाखल करण्यापुर्वी प्रतिवादी क्र.४ ला नोटीस दिली होती किंवा नाही. सन २००४ नंतर मी सर्वे क्र.१० च्या शेत मिळकतीवर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला सर्वे क्र.१० विकण्याचा अधिकार एकमेव मालक म्हणून होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.४ ला माझ्या आई बद्दल माहीत असण्याचे कारण नाही.

प्रश्न. प्रतिवादी क्र.४ हा बोनाफाईड खरेदीदार (Bonafide Purchaser) होता असे म्हणणे बरोबर होईल का?

उत्तर. होय.

उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**
**दिंनाक:-९/०१/२०२३**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**

<u>**पुढील उलटतपास शपथेवरप्रतिवादी क्र.४ तर्फे श्री. पि. एस. सायरे वकील साहेब:**</u>

हे मला माहीत नाही की, सन २००५ पुर्वी प्रतिवादी क्र.१ चे एकटयाचे नाव ७/१२ उता-यावर होते. हे म्हणणे खरे आहे की, रामजी यांच्या मृत्यू पश्चात प्रतिवादी क्र.१ हा कुटूंबाचा कर्ता होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ कर्ता असल्यामुळे स्वत:च्या उदर्निवाह करीता दावा मिळकत विकण्याचा अधिकार होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ एकटयाचे नाव ७/१२ उता-यावर असल्यामुळे तो वाद मिळकतीचा एकमेव मालक होता. हे महणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला एकमेव मालक म्हणून वाद मिळकत विकण्याचा पुर्ण अधिकार होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.४ ला करून दिलेले खरेदीपत्र माझ्यावर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी माझी फसवणूक केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हिस्सा मिळण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

प्रतिवादी ४ करीता उलटतपास पुर्ण.

प्रतिवादी क्र.२ व ३ करीता वकील श्री जांगडे यांचा पुकारा केला असता गैर हजर प्रतिवादी गैर हजर. सबब उलटतपास नाही.

फेर–तपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

(ओ. जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.
दिंनाकः–३०/०१/२०२३

(ओ. जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.